स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव : दि. ०२ (प्रतिनिधी) उद्योजक होण्यासाठी सर्जनशीलता, लोकांना जोडण्याची कला, जिद्द, चिकाटी आणि पडेल ते काम करण्याची तयारी या गुणांची आवश्यकता असून नवउद्योजकांनी हे गुण आत्मसात करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उद्योजक श्री. प्रमोद संचेती यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या इनोव्हेशन इन्क्युबेशन अँड लिंकेजेस केंद्राच्या वतीने सुरू झालेल्या तीन दिवसीय नवउद्योजक निवासी कार्यशाळेत प्रमुख पाहूणे म्हणून श्री. संचेती बोलत होते. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी हे अध्यक्षस्थानी होते. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त या केंद्राच्यावतीने आजी माजी विद्यार्थ्यांकडून उद्योग सुरू करण्याबाबत सर्जनशील कल्पना मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त ७७ प्रवेशिकांमधून २३ विद्यार्थ्याची निवड विद्यापीठाने केली. २३ विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या वतीने उद्योग सुरू करण्याच्या बाबतीत दिनांक ०२ ते ०४ जानेवारी २०२३ या कालावधीत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या निवासी कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते सोमवारी झाले. प्रमोद संचेती हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी अपयश प्राप्त होऊन देखील उद्योजक व्हायचे हे स्वप्न डोळयासमोर असल्यामुळे उद्योजक होऊ शकलो असे सांगताना त्यांचे अनुभव सांगितले. बाजारपेठेतील गरजा आणि बदलते स्वरूप लक्षात घेवून काय करायचे हे निश्चित करा. यशस्वी उद्योजक होण्याचे स्वप्न पहा, नफा कुठे मिळतो याचा अभ्यास करा अशा काही टिप्स त्यांनी दिल्या.

कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी भारतीय मानसिकता ते भारतीय बाजारपेठ असा प्रवास सांगताना उद्योग क्षेत्रातील नव्या कल्पना आत्मसात करा. उपलब्धता आणि समानता याव्दारे गरीब आणि श्रीमंतामधील दरी भरून काढण्याचा प्रयत्न धोरण तयार करणा-यांकडून केला जात आहे. अशावेळी सर्जनशीलतेला खुप महत्व आले आहे. सर्जनशीलता आणि कल्पना यावर आता मोठ्या शहरांची आणि मोठ्या शैक्षणिक संस्थाची मक्तेदारी राहिलेली नाही. छोट्या शहरांमधून देखील या कल्पना पुढे येत आहेत असे सांगून उद्योजक होण्यासाठी ध्येयनिश्चिती, दृष्टीकोन हे गुण महत्वाचे असल्याचे ते म्हणाले. प्रारंभी इनोव्हेशन इन्क्युबेशन अँड लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. राजेश जावळीकर यांनी प्रास्ताविक केले. संचालक प्रा. भूषण चौधरी यांनी उद्योजकीय कल्पना मागविण्यामागची संकल्पना स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समन्वयक सागर पाटील यांनी केले. संचालक डॉ. विकास गीते यांनी आभार मानले. दुपारच्या सत्रात उद्योजक छबीराज राणे, डॉ. विवेक काटदरे, डॉ. युवराज परदेशी यांनी मार्गदर्शन केले.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी